जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -४५२ दिनांक - ०४/११/२०२४**

वाघोली पोलीस स्टेशन,

**दिवसा केलेली घरफोडी वाघोली पोलीसांकडून उघडकीस**

वाघोली पोलीस स्टेशन,गु.र.नं.१०४२/२०२४,भा.न्या.संहीता कलम ३३१(३),३०५ अन्वये दाखल गुन्हयातील फिर्यादी यांनी त्याचे घरातील कपाटामधील सुटकेस मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिणे चोरी झालेबाबत तक्रार दिली होती. नमुद गुन्हयाचा तपास चालू असताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक,वाघोली पोलीस स्टेशन, श्री.पंडीत रेजितवाड, यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सपोनि भालेराव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार प्रशांत कर्णवर, व दिपक कोकरे, प्रितम वाघ, विशाल गायकवाड यांनी सी.सी.टी.व्हि.च्या व बातमीदाराच्या आधारे आरोपीचा शोध घेवून त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे तपास केला असता त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने दाखल गुन्हयात आरोपी नामे **राहूल सुभाष राठोड, वय ३० वर्षे, रा.दत्तविहार, वडजाई, वाघोली, ता.हवेली,जि. पुणे** यांचेकडुन एकुण गेले माला पैकी ४३ ग्रॅम ३६० मिली ग्रॅम वजनाचे ३,३८,२०८/- रू.किंमतीचे सोन्याचे दागिणे जप्त केले आहे.नमुद आरोपीस दाखल गुन्ह्यात अटक केली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री. शिरीष भालेराव हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, श्री. मनोज पाटील, मा.पोलीस उपआयुक्त परिमंडळ ४, श्री.हिम्मत जाधव मा.सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग, श्रीमती प्रांजली सोनवणे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाघोली पोलीस ठाणे, श्री.पंडीत रेजितवाड तसेच गुन्हे शोध पथकाचे सपोनि शिरीष भालेराव, पोलीस अंमलदार प्रशांत कर्णवर, दिपक कोकरे, प्रितम वाघ, विशाल गायकवाड, यांनी केली आहे.